महाराष्ट्र शासन

# विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

परिपत्रक क्रमांक 2026/विकास (आस्थापना)/आस्था-1/कावि-349

दिनांक : निम्न स्वाक्षरीत

## प रि प त्र क

* * * * * *

**संदर्भ:**-(01) महाराष्ट्र शासन, माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, परिपत्रक क्रमांक: मांतस 057/1/2013-DIT(MH)- DIT(MH), दिनांक 20 ऑगस्ट, 2013.

(02) महाराष्ट्र शासन, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, परिपत्रक क्रमांक: मांतस-2022/प्र.क्र. 62/से-1/39, दिनांक 23 फेब्रुवारी, 2023.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र शासनाने सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयातील कामाचा निपटारा जलद होण्याकरिता सर्व पत्रव्यवहार ऑनलाईन व ई-ऑफीसव्दारे करण्याकरिता व 100 टक्के अंमलबबजावणी करण्यासंदर्भात मार्गदर्शक सुचनांसह संदर्भिय क्र.(01) व (02) द्वारे धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. सदरील शासन परिपत्रकांनुसार मंत्रालयासह सर्व स्तरावरील शासकीय कार्यातील कामकाजात संगणकाचा अधिकाधिक वापर करुन शासकीय कामकाज गतिमान व्हावे, कामकाजात सुसुत्रता यावी, दस्ताऐवज व माहिती सुरक्षित व्हावे, त्वरेने व जलद पत्रव्यवहार प्राप्त होऊन निर्णय प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी शासकीय कामकाजात ई-ऑफिस प्रणालीचा वापर करुन सदर प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी सविस्तर विवेचन करण्यात आलेले आहे. तद्‌नुषंगाने छत्रपती संभाजीनगर विभागातील जिल्हा परिषदांचे प्रशासन संगणक प्रणालींचा वापर करुन गतिमान व्हावे, दस्ताऐवज व माहिती सुरक्षित व्हावी, सर्व स्तरावरील पत्रव्यवहार व संचिकांचे संचलन त्वरेने व जलद व्हावे  ही आवश्यकता विचारात घेऊन खालील प्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

:***परिपत्रक***:

ज्याअर्थी, छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्हा परिषदांचा पत्रव्यवहार ऑनइलाईन ई-ऑफीसव्दारे पत्रव्यवहार करणे आवश्यक असतांना अद्यापही बहुतांश पत्रव्यवहार ऑफलाईन / हार्ड कॉपीच्या स्वरुपात सादर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

ज्याअर्थी, राज्य शासनाने संपूर्ण शासकीय कामकाज ई-ऑफीसव्दारे करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे, त्याअर्थी ग्राम विकास विभागांतर्गत दैनंदिन कार्यालयीन कामकाज संगणक प्रणाली व आंतरजाल (INTERNET) चा पुरेपूर वापर करण्यात येत असल्यामुळे व ई-ऑफीस प्रणालीचा वापर सर्व जिल्हा परिषदांमध्ये होत असल्याचे दृष्टोत्पत्तीस आले आहे. यामूळे जिल्हा परिषद यंत्रणा व अधिनिस्त कार्यालये यामध्ये ई-ऑफीसचा होणारा वापर विचारात घेता, जिल्हा परिषदांमार्फत वरिष्ठ कार्यालय व अधिनस्त कार्यालय यांचेशी करण्यात येणारा गोपनिय पत्रव्यहार वगळता दैनंदिन सर्व प्रकाराचा पत्रव्यवहार ऑनलाईन व ई-ऑफीसव्दारे करणे शक्य आहे. तसेच यामूळे दैनंदिन कार्यालयीन कामकाज गतीमान होणे, पत्रव्यवहारातील वेळीची बचत, साहित्य सामुग्रीचा अपव्यय कमी होणे व शासकीय अभिलेख्यांचे डिजिटल स्वरुपात रुपांतरण होवून त्याचे जतन करणे सोपे होणार आहे. यामुळे जिल्हा परिषद प्रशासन

***मागे पहा..***

गतीमान व प्रभावी होण्याच्या दृष्टीने याद्वारे छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्हा परिषदांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(01) जिल्हा परिषद स्तरावरुन विभागीय आयुक्त कार्यालय तसेच शासनास करण्यात येणारा 100 टक्के पत्रव्यवहार दिनांक 01 जून, 2026 पासून ई-ऑफिसद्वारे व आवश्यक तेथे ई-मेल आणि इतर ऑनलाईन सुविधांचा उपयोग करुनच करण्यात यावा.

(02) जिल्हा परिषद स्तरावरुन अधिनस्त पंचायत समिती व इतर कार्यालयांना करण्यात येणारा पत्रव्यवहार देखील ई-आफिस व ऑनलाईन माध्यमांचा अधिकाधिक वापर वाढवून करण्यात यावा.

(03) यापूढे विभागीय आयुक्त कार्यालयांशी जिल्हा परिषद पातळीवरुन करण्यात येणारा पत्रव्यवहार कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार नाही व त्यास प्रतिबंध राहील.

(04) यापूढे जिल्हा परिषदांतर्गत होणारा गोपनिय पत्रव्यवहार वगळता इतर सर्व प्रकारचा पत्रव्यवहार ई-ऑफिस व ऑनलाईन पध्दतीने 100 टक्के साध्य होण्यासाठी जिल्हा परिषदेतील विभाग प्रमुख त्या-त्या स्तरावर जबाबदार राहतील.

(05) सदरील कार्यपध्दती यशस्वी करण्यासाठी आवश्यकतेनुसार आपले अधिनस्त सर्व संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना ई-ऑफीसचे प्रशिक्षण देण्यात यावे.

या परिपत्रकाद्वारे निर्देशित करण्यात येते की, दि. 01 जून, 2026 पासून पुढे छत्रपती संभाजीनगर विभागातील जिल्हा परिषद स्तरावरुन या कार्यालयास करण्यात येणारा पत्रव्यवहार, पाठविण्यात येणारे प्रस्ताव ई-ऑफिस व ऑनलाईन पध्दतीचा अवलंब न करता पाठविल्याचे आढळून आल्यास अशा जिल्हा परिषदेतील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. तसेच ऑफलाईन पध्दतीने पाठविण्यात आलेला पत्रव्यवहार स्वीकारण्यात येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

Digitally signed by
G SREEKANTH
Date: 21-05-2026
12:41:12

**जी. श्रीकांत** (भा.प्र.से.)
**विभागीय आयुक्त,**
**छत्रपती संभाजीनगर विभाग**

- **माहिती व उचित कार्यवाहीस्तव.**

(01) **उपसचिव, ग्राम विकास,** बांधकाम भवन 25, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-400 001.

(02) **मुख्य कार्यकारी अधिकारी,** जिल्हा परिषद, (सर्व)——————

(03) **उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),** जिल्हा परिषद, (सर्व)—————— यांना सुचित करण्यात येते की, आपले कार्यालयाचे संकेतस्थळावर सदर परिपत्रक कायम उपलब्ध राहील याची दक्षता घ्यावी.

(04) **गट विकास अधिकारी,** पंचायत समिती,(सर्व)——————

********